# १०० दिवस  वाचन अभियान

## (Reading Campaign)

# इयत्ता निहाय उपक्रम नियोजन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,महाराष्ट्र,पुणे.

## बालवाटिका, इयत्ता पहिली व दुसरीसाठीचे उपक्रम

साध्य करावयाचे विकासात्मक ध्येय आणि अध्ययन निष्पत्ती

❖ **प्रभावी संवाद**

- चिकित्सक आणि सर्जनशील विचार
- विविध प्रकारची माहिती शोधण्याची व समजून घेण्याची आणि त्यावर आत्मचिंतन करण्याची क्षमता

❖ **सहभागी अध्ययनकर्ता**

| अ क्र. | उपक्रम | आवश्यक संसाधने |
|---|---|---|
| आठवडा१ | **ग्रंथालय भेट**<br>• सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या ग्रंथालयास भेट द्यावी आणि उपलब्ध पुस्तके माहित करून घ्यावेत.<br>• प्रत्येक विद्यार्थ्याला वाचनासाठी वयानुरूप पुस्तके दयावी आणि चौथ्या आठवड्यात त्याविषयी विद्यार्थ्याला सांगू द्यावे.<br>• घरी पुस्तक वाचन सुकर होण्यासाठी कुटुंबातील एक प्रौढ व्यक्ती सोबत उपस्थित असणे आवश्यक आहे. | • ग्रंथालयातील पुस्तके |
| | **वर्णमाला शब्द (बालवाटिका)**<br>• मुलाना वाळू/भूसा ने भरलेल्या ट्रे/खोका मध्ये हातांची बोटे फिरवून अक्षरे शोधण्यास लावणे. जेणे करून मुलाना अक्षरनिर्मिती समजण्यास मदत होईल.<br>• मुलांना खेळण्याच्या पिठाच्या (चिकण माती) सहाय्याने अक्षरे बनविण्यास प्रोत्साहित करणे. | • वाळू/भुसा ने भरलेला ट्रे/खोका<br>• चिकणमाती/ खेळण्याचे पीठ<br>• साधनपेटी |
| | **कौटुंबिक कथा (वर्ग१, २)**<br>• मुलांना कुटुंबातील सदस्याबद्दल छोट्या गोष्टी तयार करण्यास मदत करणे.<br>• त्यांना या गोष्टी कागदावर उतरवू द्या आणि जुनी कौटुंबिक छायाचित्रे जोडू द्या.<br>• मुलांना सुट्ट्या, वाढदिवस आणि कौटुंबिक सुट्ट्या यासारख्या विशेष दिवसांबद्दलच्या गोष्टी लिहिते करणे. आणि नंतर वर्गमित्राना एकमेकांच्या सोबत कथा वाचू देणे. | • साधनांची आवश्यकता नाही. |

| | | |
|---|---|---|
| आठवडा २ | **फळे आणि फुले**<br>• फुलांची किंवा फळांची यादी तयार करण्याचे काम विद्यार्थ्यांना देणे.<br>• विद्यार्थ्यांना यादीतून फळे व फुले निवडण्यास सांगणे.<br>• त्यानंतर विद्यार्थ्यांने ठरवून दिलेल्या फूल व फळाविषयी वाचणे आणि दुसऱ्या दिवशी वर्गासमोर तेच वाचणे.<br>• नाव,प्राणी,गोष्ट,फूल,फळ हा खेळ खेळला जाऊ शकतो, जिथे गटाला दिलेल्या नावाच्या सुरवातीच्या अक्षरापासून तयार होणारे शब्द मुलांनी गोळा करावे. | • फळ आणि फुले असलेले यांचे संदर्भ साहित्य |
| आठवडा ३ | **हावभावयुक्त कविता**<br>• विद्यार्थ्यांना स्वतःच्या आवडीच्या किंवा शिक्षकांनी सुचविलेल्या कविंच्या कविता वाचण्यास सांगणे.<br>• विद्यार्थ्यांनी शिक्षकाच्या मदतीने कविताच्या आधारे नाटिका,नृत्य बसविणे. | • वाचन साहित्य किंवा काही कवितांची पुस्तके |
| आठवडा ४ | **सहभागी वाचन**<br>• साक्षरतेच्या सुरवातीच्या टप्प्यावर सहभागी वाचन फार महत्वाचे असते. इयत्ता पहिली आणि दुसरीसाठी ही वाचन पद्धती अतिशय प्रभावी ठरते.<br>• शिक्षक मुलांना वाचून दाखवत असताना पुस्तकातील मजकूर आणि चित्रांकडे मुलांचे लक्ष वेधले जाते.मुलांचा कल लिखित शब्द उच्चारलेल्या शब्दासोबत जुळवून घेण्याकडे असतो.त्यामुळे मुले हळूहळू पुस्तके वाचण्याचा प्रयत्न करतात. या प्रक्रियेतून शिक्षक पुस्तक डावीकडून उजवीकडे अभिव्यक्तीसह कसे वाचतात, हे देखील मुले शिकतात. | • वाचन साहित्य किंवा गोष्टी आणि चित्रांची पुस्तके |
| | **शाळा ग्रंथालयास भेटी**<br>• पहिल्या आठवड्यात ग्रंथालयातून दिलेल्या पुस्तिकेवर मुलांना व्यक्त होण्यास सांगणे.<br>• पुस्तकांचे वाचन मुलांना १४ व्या आठवड्यापर्यत आवश्यक आहे त्यासाठी इतर वयानुरूप योग्य असे पुस्तक मिळवून देणे. | • ग्रंथालयातील पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| **आठवडा ५** | **गोष्टी पुन्हा पुन्हा सांगणे.**<br>• गोष्टींचा सारांश: मुलाना गोष्ट वाचून झाल्यानंतर ५ वाक्यात गोष्टींचा सारांश सांगण्यास प्रोत्साहित करणे.<br>• अशा प्रकारचा उपक्रम मुलांना गोष्टीच्या सुरवातीपासून शेवटपर्यत श्रवण व विचार करण्यास प्रवृत्त करणे.<br>• हा उपक्रम मूलांना गोष्टीतील महत्वाचे, कमी महत्वाचे घटक समजून घेण्यास व त्यातील फरक समजण्यास मदत करेल. | • वाचन साहित्य किंवा गोष्टी आणि चित्रांची पुस्तके<br>• गोष्टीच्या सारांशा साठी कृतिपत्रिका |
| **आठवडा ६** | **शीर्षक वृक्ष**<br>• कथानक आणि पात्रे वाचल्यानंतर मुलांना कोणत्याही विशिष्ट कथेच्या पर्यायी शीर्षकांचा विचार करण्यास प्रोत्साहित करावे.<br>• शिक्षक मुलांसोबत चर्चा करत फळ्यावर शीर्षक वृक्ष काढू शकतात. | • वाचन साहित्य किंवा गोष्टी आणि चित्रांची पुस्तके<br>• चित्र काढण्यासाठी आवश्यक साहित्य |
| **आठवडा ७** | **मी कोण आहे?**<br>• Character Mapping:मुलांना कथेतील पात्र, त्यांची वैशिट्ये ओळखण्यासाठी आणि सदरसंपुर्ण वर्गाला सांगण्यासाठी प्रोत्साहित करावे. | • वाचन साहित्य किंवा गोष्टी आणि चित्रांची पुस्तके<br>• मुख्यपात्र आणि वैशिष्ट्यसहीत कृती पत्रिका |
| **आठवडा ८** | **मी लिहितो :**<br>• आठवड्याचे वृत्तपत्र तयार करणे-मुलांना गेल्या आठवड्यात किंवा महिन्यात वाचलेल्या गोष्टींबद्दल/घटनाबद्दल लिहण्यास प्रवृत्त करावे. | • संसाधनांची गरज नाही |
| **आठवडा ९** | **महिन्याचे विषय/थीम(Theme)**<br>• विषय किंवा थीम आधारित वाचन संबंधित उपक्रम वर्षभर आयोजित केले जाऊ शकतो.<br>• उदाहरणार्थ-राष्ट्रीय नेते, पर्यावरण दिन, जलसंधारण, स्वच्छ भारत मिशन, एक भारत श्रेष्ठ भारत, संविधान आणि मूलभूत कर्तव्ये, राष्ट्रीय सुट्ट्या, क्रीडा आणि जगभरातील प्रसिद्ध खेळाडू, ऑलपिक आणि कॉमनवेल्थ खेळ, स्पर्धा,कला, संस्कृती आणि उत्सव, भारतीय स्वातंत्र्य | • वाचन साहित्य किंवा(Theme) थीम आधारित गोष्टींवरील पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| | संग्रामातील क्रांतिकारकांशी संबंधित पुस्तके इ. | |

| | | |
|---|---|---|
| आठवडा १० | **चला काहीतरी बनवूया**<br>• शिक्षक/पालक मुलाना वर्गात अग्नीचा वापर न करता काही साधे खाद्यपदार्थ तयार करायला लावणे. उदा: भेळ, सरबत इ. आणि विद्यार्थ्यांना गटाद्वारे त्यासबंधी पाककृतीचे पुस्तक तयार करण्यास सांगणे.<br>• विद्यार्थी त्यांचे पाककृती पुस्तक वर्गात वाचू शकतात. | • वाचन साहित्य किंवा विविध खाद्यपदार्थांची पाककृती<br>• पाककृतीसाठी कृती पत्रिका |
| आठवडा ११ | **गंमती जमती**<br>• शिक्षक मुलांसोबत एखाद्या जादूगाराप्रमाणे वेशभूषा व अभिनय करू शकतात व त्या वेळी या प्रमाणे जादुगाराप्रमाणे उच्चार करतात .उदा.आबरा का डाबरा ....गिली गिली छू.........<br>• विद्यार्थी काही सर्जनशील संदेश (magic charm) तयार करु शकतात,जेणे करून चांगल्या कामासाठी त्यांचे उपयोग करतील तसेच वर्गासामोर त्याचे वाचन करतील. | • वाचन साहित्य किंवा magic charm संदर्भातील पुस्तके |
| आठवडा १२ | **ड्रॉप एव्रिथिंग अँड रीड (DEAR)**<br>• कोणत्याही एका ठरवलेल्या दिवशी शाळेतील प्रत्येकजण शाळेत किंवा घरी असतील तरी इतर कोणतेही काम न करता फक्त किमान २० मिनिटे प्रकट वाचन करतील.<br>• यासाठी वेळ ठरवता येईल. उदा- मंगळवारी<br>• सकाळी ११ शाळेत उपस्थित असलेले सर्व विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी हे सुनिश्चित करतात की ते या उपक्रमासाठी तयार आहेत आणि सोबत काही वाचन साहित्य आणतात. | • वाचन साहित्य जसे की पुस्तके किंवा वर्तमानपत्रे |
| आठवडा १३ | **माझी गोष्ट माझ्या भाषेत -**<br>• दरवर्षी २२ फेब्रुवारी हा आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन म्हणून साजरा केला जातो.<br>• त्यादिवशी शिक्षक मुलांना कोणत्याही भाषेतील (प्रादेशिक/मातृभाषेसह) कोणतेही पुस्तक निवडतील आणि त्या पुस्तकाबद्दल मनोगत लिहायला सांगतील. | • कोणत्याही भाषेत उपलब्ध असलेली पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| **आठवडा १३** | **महापुरुषांच्या प्रेरणा**<br>• महात्मा गांधी, सरदार वल्लभ भाई पटेल, सुभाषचंद्र बोस इत्यादींवरील पुस्तके किंवा निबंध शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरणा देतील .<br>• विद्यार्थ्यांना प्रेम, आपुलकी, सेवाभावी कृती करण्यास सांगणे व त्याची शिक्षकाने नोंद घेणे.<br>• पुढील आठवड्यात मुलांनी वर्गासमोर हा अनुभव सांगणे. | • सरदार पटेल, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस इत्यादींवरील गोष्टी /निबंध पुस्तके |
| **आठवडा १४** | **वाचा आणि कृती करा**<br>• विद्यार्थ्यांना गटामध्ये काम करण्यासाठी नियुक्त करणे.<br>• त्यांना वाचण्यासाठी लहान नाटिका देणे.<br>• त्यानंतर, मुलाना एकमेकांच्या सहकार्याने संपुर्ण कथा तयार करण्यासाठी सांगणे. | • वाचन साहित्य किंवा बालनाट्य साहित्य |
| | **शाळा ग्रंथालयास भेट**<br>• प्रत्येक मुलाने वाचलेल्या पुस्तकाबद्दल काही ओळी सांगायच्या आहेत जे त्यांना आठवडा १ मध्ये ग्रंथालयातून दिले होते.<br>• पुस्तकांचे वाचन मुलांना १४ व्या आठवड्यापर्यत आवश्यक आहे त्यासाठी इतर वयानुरूप योग्य असे पुस्तक मिळवून देणे. | • वाचन साहित्य |

**टीप:शाळा बंद असल्यास, शाळेच्या ग्रंथलयास अभ्यास भेट, वाचा आणि कृती करा सारखे उपक्रमा ऐवजी पुढील कृती घेतल्या जाव्यात .**

**उदा: विषय:- १. आपण जे अन्न खातो त्याविषयी माहीत होणे**

- शिक्षक ,पालक किंवा स्वयंसेवक विद्यार्थ्यांना आदल्या दिवशी खाल्लेल्या अन्नपदार्थांची यादी करून घेण्यास सांगतील.
- दुसऱ्या दिवशी वर्गात किंवा घरी ते एकत्रित करतील.
- मुले सर्वप्रथम अन्नपदार्थांचे नाव वाचण्याचा प्रयत्न करतील.
- पाणी, दूध, चहा, लिंबू, डाळ, भाजीपाला, फळे इत्यादी खाद्यपदार्थांचे प्रत्येक नाव विद्यार्थ्यांकडून सुरुवातीचा अक्षराचा ध्वनी वापरून वाचन करून घेतले जाईन .
- हे शब्द शिक्षकांद्वारे फळ्यावर लिहिले जातील. जर उपक्रम घरी/सामुदायिक केंद्रांवर आयोजित केला असेल तर नावे कागदाच्या तुकड्यावर लिहिली जाऊ शकतात.
- दुसऱ्या दिवशी यादीतील आणखी शब्द घेतले जातील आणि वर्गात वाचले जातील.

**२. विषय- श्रवण आणि सहभागी करणे.**

- शिक्षक,पालक किंवा स्वयंसेवक विद्यार्थ्यांना टीव्ही किंवा रेडिओवरील कोणताही कार्यक्रम किंवा पालक/आजी-आजोबांनी सांगितलेली गोष्ट ऐकण्यास आणि पाहण्यास सांगतील.
- ते कथा/कार्यक्रमातील पात्रे किंवा नावे ऐकतील.
- त्यांच्या ऐकण्याच्या कौशल्याने ते त्यांचे शिक्षक,पालक किंवा स्वयंसेवक यांना कथेचे किंवा कार्यक्रमाचे नाव सांगतील आणि शिक्षक,पालक किंवा स्वयंसेवक त्यांना काळ्या फळ्यावर किंवा कोणत्याही कागदावर लिहितील.
- आता विद्यार्थ्यांची फळ्यावर किंवा कागदावर पुरेशी नावे लिहिली जातील, विद्यार्थ्यांना नावे वाचण्यास सांगितले जाईल.
- शब्द भिंत वर्गात तयार केली जाईल आणि विद्यार्थ्यांना दररोज सकाळी वाचण्यास सांगितले जाईल आणि त्यापैकी काही विद्यार्थी त्यांनी ऐकलेल्या,पाहिलेल्या कथा किंवा कार्यक्रमाबद्दल इतरांना सांगतील .

## इयत्ता तिसरी व पाचवी उपक्रम

साध्य करावयाचे विकासात्मक ध्येय आणि अध्ययन निष्पत्ती

- **प्रभावी संवाद**
  - चिकित्सक आणि सर्जनशील विचार
  - विविध प्रकारची माहिती शोधण्याची व समजून घेण्याची आणि त्यावर आत्मचिंतन करण्याची क्षमता

- **सहभागी अध्ययनकर्ता**

| अ क्र. | उपक्रम | आवश्यक संसाधने |
|---|---|---|
| आठवडा१ | **शाळेच्या ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट–**<br>• सर्व मुलांनी शाळेच्या ग्रंथालयाला भेट द्यावी आणि उपलब्ध पुस्तकांचा शोध घ्यावा.<br>• प्रत्येक मुलाला चौथ्या आठवड्यात वाचण्यासाठी आणि त्याबद्दल सांगण्यासाठी त्याच्या वयोगटानुसार पुस्तक दिले जावे..<br>• घरी पुस्तक वाचन सुकर होण्यासाठी कुटुंबातील एक प्रौढ व्यक्ती सोबत उपस्थित असणे आवश्यक आहे. | • ग्रंथालयातील पुस्तके |
| | **गोलातल्या गप्पा**<br>• विद्यार्थी गोलाकार बसतात आणि शिक्षक त्यांना गोष्टींची सुरुवात करून देतात आणि दृश्य सेट करून कथेला सुरुवात करतात.<br>• प्रत्येक विद्यार्थी एक वाक्य जोडून कथा पुढे नेतो आणि संपूर्ण वर्गात कथा सांगतो. | • संसाधनांची आवश्यकता नाही |
| आठवडा २: | **वेशभूषा आणि कथन**<br>• विद्यार्थी त्यांचे आवडते लेखक किंवा कवी म्हणून वेशभूषा करतात आणि वर्गाला त्या पात्राची कथा किंवा कविता वाचून दाखवतात.<br>• तसेच ते इतरांनाही त्याबद्दल वाचण्यास प्रोत्साहित करेल. | • विविध लेखक किंवा कवींची चित्रे त्या लेखक किंवा कवींच्या कथा किंवा कवितांचं पुस्तक |

| | | |
|---|---|---|
| आठवडा ३ | **बेंड द एंड- (कथानकाचा शेवट वळविणे)**<br>• शिक्षक महिन्याच्या थीमनुसार (Theme) निवडलेली कथा वाचतात (त्याला नैतिक महत्त्व असणे आवश्यक आहे) आणि विद्यार्थ्यांना कथेचा शेवट बदलण्यास सांगतो.<br>• प्रमुख नायक म्हणून त्यांनी दिलेल्या परिस्थितीत कसे वागले असते हे सांगतात . | • कथा पुस्तके |
| आठवडा ४ | **दृश निश्चिती - ( सेट द सीन )**<br>• शिक्षक वर्गाला ४ किंवा ५ च्या गटात विभागतात .<br>• तो किंवा ती त्यांना दृश्यासह सादर करते (कोणत्याही दृश्याचे वर्णन करते, उदाहरणार्थ: जुना किल्ला , वाळवंट किंवा खेळाचे मैदान) आणि राजा किंवा राणी,ड्रॅगन ,शेतकरी,उंट,जादूगार,मुले यांसारख्या दृश्यामधील पात्रांचे वर्णन करते.<br>• मग शिक्षक त्यांना एक लघुकथा तयार करण्यास सांगतात जी लघुकथा गटातील एक सदस्य मोठ्याने वाचू शकेल. | •कथा पुस्तके |
| | **शाळेच्या ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट -**<br>• प्रत्येक मुलाने वाचलेल्या पुस्तकाबद्दल काही ओळी सांगायच्या आहेत जे त्यांना आठवडा १ मध्ये ग्रंथालयातून दिले होते.<br>• पुस्तकांचे वाचन मुलांना १४ व्या आठवड्यापर्यत आवश्यक आहे त्यासाठी इतर वयानुरूप योग्य असे पुस्तक मिळवून देणे. | • ग्रंथालयातील पुस्तके |
| आठवडा ५ | **लोककथा/लोकगीत यांचा आनंद घेणे -**<br>• शिक्षक **"एक भारत श्रेष्ठ भारत"** कार्यक्रमांतर्गत ज्या राज्याशी भागीदारी झाली आहे त्या राज्याच्या समृद्ध वारशातून एक मनोरंजक लोककथा निवडतात आणि ती वर्गात वाचून दाखवतात आणि काही विद्यार्थ्यांना त्यावर अभिनय करावयास सांगतात . | • लोककथांची पुस्तके |
| आठवडा ६ | **वाङ्मयीन दिनदर्शिका -**<br>• विद्यार्थी विविध लेखक किंवा कवींच्या जन्मतारखा चिन्हांकित करून आणि त्यांच्या कलाकृतींची यादी करून वाङ्मयीन दिनदर्शिका तयार करतात<br>• या यादीतून ते वाचण्यासाठी कथा किंवा कविता निवडतात . | • दिनदर्शिका, कथा/कविता पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| **आठवडा ७** | **बोलणे -**<br>• हा उपक्रम जोड्यांमध्ये आयोजित करणे आवश्यक आहे.  एक विद्यार्थी ग्रंथकार किंवा लेखक आहे आणि दुसरा विद्यार्थी  लेखकाने तयार केलेले काल्पनिक पात्र आहे.<br>• एका जोडीतील दोन्ही विद्यार्थ्यांनी पात्र-लेखक जोडीचे पुस्तक वाचणे आवश्यक आहे.<br>• ते एकमेकांना पात्र-लेखक याबाबत ५ प्रश्न विचारतील .<br>• लेखकाने लिहिलेल्या स्थानिक कथा आणि त्यांचे प्रसिद्ध पात्र | • विविध काल्पनिक पात्रांवरील साहित्य किंवा पुस्तके |
| **आठवडा ८** | **विविध वस्तूंच्या आधारे अभिव्यक्ती**<br>• शिक्षक विविध वस्तूंनी भरलेली पिशवी (जसे मुकुट, तलवार, भांडे, हातमोजे, अंगठी, कांडी इ.) किंवा घरी विद्यार्थ्यांसाठी विविध वस्तूंची यादी तयार करावयास सांगणे.<br>• मुले एक वस्तू निवडतात (घरातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत किंवा शिक्षकांनी  यादृच्छिकपणे नियुक्त केलेले ) आणिमुले त्याचा चागल्या कामाकरिता वापर कसा करतील या बाबत सांगतील.<br>• मग प्रत्येक विद्यार्थ्यांने त्यांची निर्मिती संपूर्ण वर्गाला वाचून दाखवावी. | • विविध वस्तूंच्या वापराबद्दल साहित्य किंवा पुस्तके<br>• विविध वस्तूंचे संकलन |
| **आठवडा ९** | **कविता वाचन**<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वतःच्या आवडीच्या किंवा शिक्षकांनी शिफारस केलेल्या कवींच्या कविता वाचण्यास सागणे.<br>• सराव कृती म्हणून ते शिकलेल्या काव्यात्मक शब्दांचा वापर करून त्यांची स्वतःची कविता तयार करावयास सांगणे. | • कवितांची पुस्तके किंवा कवितांसह वाचन साहित्य |
| **आठवडा १०** | **माझी गोष्ट माझ्या शब्दात (मेरी कहानी, मेरी जुबानी)**<br>• प्रत्येक विद्यार्थी नदी, झाड, गव्हाचे रोप इत्यादी गोष्टींची भूमिका/ओळख घेणे  आणि त्यांच्या भूमिकेत जाऊन त्यांचा जीवन प्रवास सादर करणे. | • विविध नैसर्गिक वस्तूंच्या प्रवास जीवनासह साहित्य किंवा पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| | **आजी आजोबांच्या गोष्टी.**<br>• शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या आजी-आजोबांनी सांगितलेली एक कथा-कथन करण्यास/लिहिण्यास सांगतील आणि त्यातून ते काय शिकले हे विचारतील .<br>• प्रत्येक विद्यार्थी ती कथा वर्गात वाचून दाखवतील .<br>• त्यानंतर ते असा कोणताही संग्रह वाचू शकतात (उदा.सुधा मूर्ती -आजीची कथांची बॅग) | • संसाधनांची आवश्यकता नाही |
| **आठवडा ११** | **मुखपृष्ठावरून पुस्तक ओळखणे-**<br>• पुस्तक सप्ताह किंवा साहित्य दिनाच्या उत्सवाचा एक भाग म्हणून, शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडत्या पुस्तकासाठी मुखपृष्ठ तयार करण्यास सांगतील .<br>• सामग्रीशी संबंधित मुखपृष्ठ तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रथम पुस्तक वाचायला सांगतील | • कथांसह साहित्य किंवा पुस्तके वाचणे<br>• मुखपृष्ठ तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य |
| **आठवडा १२** | **ड्रॉप एव्रिथिंग अँड रीड (DEAR)**<br>• कोणत्याही एका ठरवलेल्या दिवशी शाळेतील प्रत्येकजण शाळेत किंवा घरी असतील तरी इतर कोणतेही काम न करता फक्त किमान २० मिनिटे प्रकट वाचन करतील.<br>• यासाठी वेळ ठरवता येईल. (उदा .शाळेत मंगळवारी सकाळी ११:०० वा)<br>• शाळेतील सर्व उपस्थित-विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी हे या उपक्रमासाठी तयार असल्याची खात्री करून घेतात आणि काही वाचन साहित्य देतात. | • वाचन साहित्य जसे पुस्तके किवा वर्तमानपत्र |
| **आठवडा १३** | **स्वतःच्या भाषेत कथा वाचणे .**<br>• दरवर्षी २२ फेब्रुवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन म्हणून साजरा केला जातो.<br>• त्यादिवशी शिक्षक कोणत्याही भाषेतील (प्रादेशिक/मातृभाषेसह) कोणतेही पुस्तक निवडतील आणि नंतर विद्यार्थ्यांना त्या पुस्तकाबद्दल त्यांचे मनोगत लिहायला सांगतील . | • कोणत्याही भाषेतील उपलब्ध पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| आठवडा १४ | **इफ आय वर (मी असते तर)-**<br>• शिक्षक विद्यार्थ्यांना दिलेल्या व्यवसायक्षेत्रामधून (नाविक/ सैनिक/ वैज्ञानिक इ.) व्यवसाय निवडण्यास सांगतात.<br>• त्यानंतर त्यांना त्या व्यवसायातील प्रमुख व्यक्तिमत्त्वाची कथा वाचण्यास सांगितले जाते आणि त्यांनी (नाविक/ सैनिक/ वैज्ञानिक इ.) जगाला एक चांगले स्थान कसे बनवले याबद्दल वर्गात त्याबद्दल बोलण्यास सांगितले जाते. | • वेगवेगळ्या व्यवसायावरील साहित्य किंवा पुस्तके वाचणे |
| | **शाळेच्या ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट-**<br>• प्रत्येक मुलाने वाचलेल्या पुस्तकाबद्दल काही ओळी सांगायच्या आहेत जे त्यांना ४ व्या आठवड्यात वाचनालयातून दिले जाते . | • ग्रंथालयातील पुस्तके |

**टीप: शाळा बंद असल्यास, शाळेच्या ग्रंथालयाला भेट, गोलातल्या गप्पा, ऐवजी पुढील कृती घेतल्या जाव्यात .**

१. **विषय- तुमचे अन्न जाणून घ्या-**

- शिक्षक ,पालक किंवा स्वयंसेवक विद्यार्थ्यांना आदल्या दिवशी खाल्लेल्या अन्नपदार्थांची यादी करून घेण्यास सांगतील.
- दुसऱ्या दिवशी वर्गात किंवा घरी ते एकत्रित करतील.
- ते सर्व प्रथम खाद्यपदार्थाचे नाव वाचण्याचा प्रयत्न करतील.
- चपाती , पाणी, दूध, चहा, लिंबू, डाळ, भाजीपाला, फळे इत्यादी खाद्यपदार्थांच्या नावाचे पहिले अक्षर विद्यार्थ्यांकडून वाचून घेतील
- हे शब्द शिक्षकांद्वारे फळ्यावर लिहिले जातील. जर उपक्रम घरी किंवा सामुदायिक केंद्रांवर आयोजित केला असेल तर नावे कागदाच्या तुकड्यावर लिहिली जाऊ शकतात.
- दुसऱ्या दिवशी यादीतील आणखी शब्द घेतले जातील आणि वर्गात वाचले जातील.

२. **विषय- श्रवण आणि सहभागी करणे**

- शिक्षक,पालक किंवा स्वयंसेवक विद्यार्थ्यांना टीव्ही किंवा रेडिओवरील कोणताही कार्यक्रम किंवा पालक,आजी-आजोबांनी सांगितलेली गोष्ट ऐकण्यास आणि पाहण्यास सांगतील.
- ते कथा किंवा कार्यक्रमातील पात्रांची नावे ऐकतील.
- त्यांच्या ऐकण्याच्या कौशल्याने ते त्यांचे शिक्षक,पालक किंवा स्वयंसेवक यांना कथेचे किंवा कार्यक्रमाचे नाव सांगतील आणि शिक्षक किंवा पालक,स्वयंसेवक त्यांना काळ्या फळ्यावर किंवा कोणत्याही कागदावर लिहण्यास सांगतील.

- आता विद्यार्थ्यांची फळ्यावर किंवा कागदावर पुरेशी नावे लिहिली जातील, विद्यार्थ्यांना नावे वाचण्यास सांगितले जाईल.
- वर्गात शब्दांची भिंत असा उपक्रम तयार केला जाईल आणि विद्यार्थ्यांना दररोज सकाळी वाचण्यास सांगितले जाईल आणि त्यापैकी काही लोक त्यांनी ऐकलेल्या किंवा पाहिलेल्या कथा किंवा कार्यक्रमाबद्दल विद्यार्थ्यांना सांगतील
- दुसऱ्या दिवशी यादीतील आणखी शब्द घेतले जातील आणि वर्गात वाचले जातील.

## इयत्ता सहावी ते आठवीसाठीचे उपक्रम

साध्य करावयाचे विकासात्मक ध्येय आणि अध्ययन निष्पत्ती

- **प्रभावी संवाद**
  - चिकित्सक आणि सर्जनशील विचार
  - विविध प्रकारची माहिती शोधण्याची व समजून घेण्याची आणि त्यावर आत्मचिंतन करण्याची क्षमता
- **सहभागी अध्ययनकर्ता**

| अ.न. | उपक्रम | आवश्यक संसाधने |
|---|---|---|
| आठवडा१ | **शाळेच्या ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट-**<br>• सर्व मुलांनी शाळेच्या ग्रंथालयाला भेट द्यावी आणि उपलब्ध पुस्तकांचा शोध घ्यावा.<br>• प्रत्येक मुलाला चौथ्या आठवड्यात वाचण्यासाठी आणि त्याबद्दल सांगण्यासाठी त्याच्या वयोगटानुसार पुस्तक दिले जावे .<br>• कुटुंबातील एक प्रौढ व्यक्ती सोबत घरी पुस्तक वाचन सुकर होण्यासाठी उपस्थित असणे आवश्यक आहे. | • ग्रंथालयातील पुस्तके |
| आठवडा २ | **वाचा आणि लिहा**<br>• या कृतीद्वारे , विद्यार्थी वाचायला शिकतात आणि दिलेल्या विषयावर कथा तयार करतात.<br>• शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी एक कथा देतील .शिक्षक कथेतून कोणतीही बाबी निवडतात .(उदाहरणार्थ- कथेमध्ये सायकल, गुलाब, झाड, पाने, प्राणी इत्यादी गोष्टींचा संदर्भ आहे. ते निवडले जाऊ शकतात) | • ग्रंथालयातील पुस्तके |
| आठवडा ३ | **कविता वाचन**<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वत:च्या आवडीच्या किंवा शिक्षकांनी शिफारस केलेल्या किंवा कुटुंबाने शिफारस केलेल्या कवींच्या कविता वाचण्यास सांगणे . | • कविता ,पुस्तक किंवा कवितांसह वाचन साहित्य |
| आठवडा ४ | **मित्रांसोबत वाचा, मनोरंजनासाठी वाचा**<br>• प्रत्येक विद्यार्थ्याला त्याने आधी वाचलेली आणि खूप आवडलेली कोणतीही लघुकथा | • कविता, पुस्तक किंवा कवितांसह वाचन साहित्य |

| | | |
|---|---|---|
| | निवडण्यास सांगणे .<br>• त्याने किंवा तिने ही कथा दुसऱ्या विद्यार्थ्याला किंवा लहान भावंडाला कथा वाचण्यास सांगणे . | |
| | **शाळेच्या ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट –**<br>• प्रत्येक मुलाने वाचलेल्या पुस्तकाबद्दल काही ओळी सांगायच्या आहेत जे त्यांना आठवडा १ मध्ये ग्रंथालयातून दिले होते.<br>• पुस्तकांचे वाचन मुलांना १४ व्या आठवड्यापर्यत आवश्यक आहे त्यासाठी इतर वयानुरूप योग्य असे पुस्तक मिळवून देणे. | • ग्रंथालयातील पुस्तके |
| **आठवडा ५** | **पात्र ओळख**<br>• अभिरूप मुलाखतीचे आयोजन करावे.जिथे विद्यार्थी मुख्य पात्रांची भूमिका घेतात आणि इतरांना पत्रकाराची भूमिका दिली जाईल .<br>• पत्रकार पात्रांना प्रश्न विचारू शकतात. हा संवाद शिक्षकाने नियंत्रित केला पाहिजे. | • वाचन साहित्य किवा गोष्टीची पुस्तके |
| **आठवडा ६** | **गाण्याचे किवा पाककृतीचे विश्लेषण**<br>• शिक्षक ५-६ ( योग्यपद्धतीचे ) लोकगीत किंवा चित्रपटातील गाणे किवा स्थानिक पातळीवरील पाककृती ची निवड करतील .<br>• प्रत्येक विद्यार्थ्याने एक गाणे किंवा पाककृती निवडावी .<br>• प्रत्येक विद्यार्थ्यांला दिलेल्या वेळेत निवडलेल्या गाण्याचे साहित्याच्या अंगाने विश्लेषण करण्यास सांगावे त्यात संदर्भ, संदेश, भावना इत्यादींचा समावेश असू शकतो,जर ती पाककृती असेल, तर विद्यार्थ्याला पाककृतीचे विश्लेषण करण्यास सांगावे . | • पाककृती/गीत पुस्तिका |
| **आठवडा ७** | **पुस्तक निवड ·**<br>• प्रत्येक विद्यार्थ्याला ते त्याच्या एखाद्या मित्राला शिफारस करतील अशा पुस्तकाचा विचार करण्यास सांगितले जाते (ते शिक्षकांनी दिलेल्या वाचन सूचीचा संदर्भ घेऊ | • पुस्तकांची नावे असलेली वाचन यादी |

| | | |
|---|---|---|
| | शकतात).<br>• निवडलेल्या पुस्तकातून, प्रत्येक विद्यार्थ्याने नंतर सर्वात खलनायकी पात्रांचा सारांश स्वरुपात वर्णन लिहिण्यास सांगावे. | |
| **आठवडा ८** | **वाचा आणि कृती करा**<br>• विद्यार्थ्यांना गटांमध्ये काम करण्यासाठी नियुक्त करावे.<br>• त्यांना वाचण्यासाठी एक लहान नाटिका द्यावे पुढे, त्यांना एकमेकांशी सहकार्य करून संपूर्ण कथा तयार करण्यास सांगितले जावे. | • वाचन साहित्य किवा नाटकाचे पुस्तके |
| **आठवडा ९वा** | **एक भारत श्रेष्ठ भारत साठी**<br>• विद्यार्थी **"एक भारत, श्रेष्ठ भारत"**अंतर्गत भागीदार राज्य/केंद्रशासित प्रदेश यांच्या जोड्या लक्षात घेवून संबंधित राज्यावरील काही मजकूर, सामग्री शोधतात.<br>• प्रत्येक जोडी वाचल्यानंतर विद्यार्थी एक कोलाज बनवतात आणि वर्गात वर्णनासह सादर करतील . | • राज्यांच्या माहितीचे पुस्तक कोलाज बनविण्याच्या कृतीपत्रिका |
| **आठवडा १०** | **स्थानिक भाज्यासाठी फळे शोध .**<br>• २०२१ हे वर्ष संयुक्त राष्ट्रांनी फळे आणि भाज्यांचे वर्ष म्हणून घोषित केले आहे.<br>• विद्यार्थ्यांना स्थानिक फळे आणि भाजीपाला, त्यांचे वाण आणि विशेष वैशिष्ट्ये याविषयी आठवडाभरात माहिती शोधण्याचे काम दिले जावे (ग्रंथालय आणि संगणक कालावधी दरम्यान)<br>• विज्ञान शिक्षक गोळा केलेल्या साहित्याची तपासणी करतात. या थीमवर काही अधिक संबंधित साहित्य वाचनास द्यावे. | • फळे आणि भाज्यांवरील पुस्तके स्थानिक फळे आणि भाज्यांवरील कार्यपत्रके |
| **आठवडा ११** | **ट्विस्ट (रंजक वळण )**<br>• शिक्षक तयारीची पायरी म्हणून एक मनोरंजक कथा निवडतील तसेच विद्यार्थ्यांचे लहान गट करतील.<br>• गटांपैकी एकाने ही कथा वर्गाला वाचून दाखवावी . पुढे, शिक्षक इतर गटांना/विद्यार्थ्यांना कथेचा शेवट वेगळ्या पद्धतीने करण्याबाबत सांगतील . | • कथा पुस्तक |

| | | |
|---|---|---|
| आठवडा १२ | **कविता वाचन**<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या स्वत:च्या आवडीच्या किंवा शिक्षकांनी शिफारस केलेल्या कवींच्या कविता वाचण्यास सांगितले जावे .<br>• कृतींचा सराव म्हणून, ते शिकलेल्या काव्यात्मक शब्दांचा वापर करून त्यांची स्वतःची कविता तयार करतील . | • कविता पुस्तक किंवा काही कवितांसह वाचन साहित्यउदाहरणांसह काव्यात्मक उपकरणांवर काही तयार संदर्भ |
| | **ड्रॉप एव्रिथिंग अँड रीड (DEAR)**<br>• कोणत्याही एका ठरवलेल्या दिवशी शाळेतील प्रत्येकजण शाळेत किंवा घरी असतील तरी इतर कोणतेही काम न करता फक्त किमान २० मिनिटे प्रकट वाचन करतील.<br>• यासाठी वेळ ठरवता येईल. (उदा .शाळेत मंगळवारी सकाळी ११:०० वा)<br>• शाळेतील सर्व उपस्थित-विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी हे या उपक्रमासाठी तयार असल्याची खात्री करून घेतात आणि काही वाचन साहित्य देतात. | • वाचन साहित्य जसे पुस्तके किवा वर्तमानपत्र |
| आठवडा १३ | **हंटिंग द पेपर्स -**<br>• विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील स्वत:च्या भाषेत कथा वाचण्यास सांगतील (कहानी पढो अपनी भाषा में)<br>• विद्यार्थ्यांना वर्तमानपत्रातील मुख्य बातम्यांची यादी करण्यास सांगतील,त्यातील एका बातमीचा/लेखाचा सारांश लिहण्यास सांगतील .<br>• दरवर्षी २२ फेब्रुवारी हा दिवस आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमिताने शिक्षक कोणत्याही भाषेतील (प्रादेशिक/मातृभाषेसह) कोणतेही पुस्तक निवडतील आणि नंतर विद्यार्थ्यांना पुस्तक वाचण्यास सांगतील व त्या पुस्तकाचा सारांश लिहण्यास सांगतील . | • वर्तमानपत्रे ,सारांश लिहण्यासाठी कोरे कागद<br>• विद्यार्थ्यांना स्वतःच्या भाषेत उपलब्ध पुस्तके. |

| | | |
|---|---|---|
| आठवडा १४ – | **आपल्या नेत्यांकडून प्रेरणा**<br>• विद्यार्थ्यांना महात्मा गांधींवरील पुस्तक किंवा निबंध शोधण्यासाठी सांगावे.<br>• कृतींचा सराव म्हणून, विद्यार्थ्यांना दयाळूपणाचे कृत्य करण्यास सांगा आणि याची नोंद करा<br>• विद्यार्थ्यांना पुढील आठवड्यात शाळेत सांगण्यासाठी प्रोत्साहित करावे.<br>• शाळेच्या ग्रंथालयाला भेट द्या<br>• प्रत्येक मुलाने ग्रंथालयातील वाचलेल्या पुस्तकाबद्दल काही ओळी सांगण्यास सांगावे. | • महात्मा गांधी वरील ग्रंथालयातील पुस्तकांवर कथा किंवा निबंध ग्रंथालयातील पुस्तके |
| | **शाळेच्या ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट –**<br>• प्रत्येक मुलाने वाचलेल्या पुस्तकाबद्दल काही ओळी सांगायच्या आहेत जे त्यांना आठवडा १ मध्ये ग्रंथालयातून दिले होते.<br>• पुस्तकांचे वाचन मुलांना १४ व्या आठवड्यापर्यत आवश्यक आहे त्यासाठी इतर वयानुरूप योग्य असे पुस्तक मिळवून देणे. | • ग्रंथालयातील पुस्तके |

**टीप: शाळा बंद असल्यास, शाळेच्या ग्रंथालयाला प्रत्यक्ष भेट , पात्र ओळख यासारखे उपक्रमाऐवजी पुढील कृती घेतल्या जाव्यात .**

❖ **उलट वाचन:**

- उलट वाचन म्हणजे पृष्ठाच्या किंवा परिच्छेदाच्या शेवटून मागे वाचत जाणे.
- परिच्छेद/पृष्ठाच्या सुरुवातीपर्यंत, मुले उजवीकडून डावीकडे वाचतात आणि प्रत्येक ओळीसाठी त्याच पद्धतीने पुढे जातात. यामुळे चिकित्सक विचार विकसित होतो आणि तसेच मुलांमध्ये वाचनात आत्मविश्वास निर्माण होतो.

❖ **झिग झॅग वाचन (ZIG ZAG रीडिंग)**

- Zig Zig Reading म्हणजे शब्द/मजकूर डावीकडून उजवीकडे आणि नंतर उजवीकडून डावीकडे वाचणे.
- मुले संपूर्ण सामग्री/मजकूर/परिच्छेदासाठी झिग झॅग पद्धतीने त्याच पॅटर्नमध्ये वाचण्याची प्रक्रिया पुन्हा करतील.
- झिग झॅग पद्धतीने वाचन केल्याने मुले जलद वाचन विकसित करू शकतात आणि त्यांच्या डाव्या-उजव्या मेंदूचा समन्वय वाढवण्यास मदत होईल .